आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२० जून २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

- नीट यूजी २०२६ फेरपरीक्षेच्या पार्श्वभूमीवर देशभरात सुरक्षेचं मॉक ड्रील / गैरप्रकार रोखण्यासाठी प्रशासनातर्फे विविध उपाययोजना

- कोल्हापूरच्या श्री अंबाबाई मंदिर विकास आराखड्यांतर्गत १ हजार ४४५ कोटी ९७ लाख रुपयांच्या विकासकामांच्या कोनशिलेचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

- आषाढी एकादशी यात्रेनिमित्त एसटीच्या साडेपाच हजार जादा गाड्या

- आंतरराष्ट्रीय योगदिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकात्यात प्रधानमंत्र्याच्या उपस्थितीत होणार

**आणि**

- पवनराजे निंबाळकर खून खटल्यात माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील आणि अन्य ७ आरोपींची निर्दोष मुक्तता

**<><><><><>**

नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा उद्या होणार असून याची पूर्वतयारी म्हणून आज एनटीए नं देशभरात मॉक ड्रील आयोजित केलं. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत व्हावी यासाठीच्या तयारीचा हा भाग आहे. या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत एनटीएच्या मुख्य कार्यालयाबाहेरची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. नीट यूजी फेरपरीक्षेच्या तयारीविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**------------व्हीसी---------------**

(उद्या होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेसाठीची तयारी पूर्ण झाल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. देशातल्या ५५१ आणि परदेशातल्या १४ शहरांमधे ही परीक्षा होणार आहे. २२ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देणार असल्याचं एनटीएनं सांगितलं. परीक्षा पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात व्हावी यासाठी पोलीस, प्रशासकीय कर्मचारी, निरीक्षक आदी दोन लाख कर्मचारी देशभरातल्या परीक्षा केंद्रावर तैनात करण्यात आले आहेत. तसंच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत, विद्यार्थ्यांची ओळख

पटवण्यासाठी आधार कार्ड आधारित बायोमेट्रिक बसवले आहेत, प्रश्नपत्रिका तसंच परीक्षेच्या इतर साहित्याची ने आण करण्यासाठी जीपीएस बसवलेल्या पोलिसांच्या वाहनांची सोय करण्यात आल्याचंही एनटीएने सांगितलं. परीक्षा केंद्र असलेल्या जिल्ह्यांमधे कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेवर देखरेख करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. देहरादूनमधे परीक्षेच्या दिवशी गर्दी जमवण्यावर बंदी घालण्यात आली आहे, तसंच परीक्षा केंद्राच्या दोनशे मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ नुसार कठोर प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. अनेक जिल्ह्यांमधे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी प्रशासनातर्फे वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

नीट यूजी फेरपरीक्षा उद्या दुपारी २ ते सव्वा पाच दरम्यान होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर सकाळी अकरा ते साडे अकराच्या सुमारास हजर व्हावं, असं एनटीएने सांगितलं आहे.

दरम्यान, नीट परीक्षेदरम्यान पेपरफुटीसारखे गैरप्रकार रोखण्यासाठी टेलिग्राम वर तात्पुरती बंदी घालण्याचा केंद्र सरकारचा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. टेलिग्रामच्या माध्यमातून गैरप्रकार झाल्याचं आढळलं असून याआधीच्या उपाययोजनांमुळे ते रोखता आले नाहीत, त्यामुळे ही बंदी योग्य असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.)

<><><><><>

कोल्हापूरच्या श्री अंबाबाई मंदिर विकास आराखड्यांतर्गत १४४५ कोटी ९७ लाख रुपयांच्या विविध कामांच्या कोनशीलेचं अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज करण्यात आलं. मूळ मंदिराचे जतन, संवर्धन आणि दुरुस्तीच्या कामांचा या विकास आराखड्यात समावेश आहे. अंबाबाई मंदिर कॉरिडॉरच्या माध्यमातून 'विकासही आणि वारसाही' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवली जात असल्याचं अमित शाह यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १२ वर्षांत अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, केदारनाथ, बद्रीनाथ आणि सोमनाथ मंदिरांच्या विकासाची कामे झाल्याचा उल्लेख अमित शहा यांनी केला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि अन्य मंत्री तसेच अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, तत्पूर्वी गृहमंत्री अमित शहा यांनी सपत्नीक अंबाबाईचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली.  या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात १४३ कोटी ९० लाख रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून मूळ मंदिराचं जतन, संवर्धन आणि दुरुस्ती कामांचा समावेश आहे. मंदिराचे पुरातन वैभव आणि भव्यता जपण्यासाठी सभोवतालच्या ४१ लहान-मोठ्या मंदिरांचे संवर्धन, नगर प्रदक्षिणा मार्गाचे सुशोभीकरण आणि मंदिर परिसर विकासाची कामेही हाती घेण्यात येणार आहेत.

<><><><><>

उद्या होणाऱ्या नीट-यूजी फेरपरीक्षेसाठी नागपूर इथल्या एका विद्यार्थ्याला अबुधाबी इथे परीक्षा केंद्र देण्यात आल्याची बातमी प्रसारमाध्यमांमधे प्रकाशित झाली होती. याची एनटीएने तातडीने दखल घेत हा प्रश्न सोडवला, या विद्यार्थ्याला नागपूर इथंच परीक्षा केंद्र दिल्याचं एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी सांगितलं.

<><><><><>

येत्या आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटी महामंडळाने ५ हजार ५०० विशेष बस सोडण्याचं नियोजन केलं आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. राज्यातल्या कोणत्याही गावातून 40 किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाईल असं त्यांनी सांगितलं.  भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

१२वा ‘आंतरराष्ट्रीय योग दिवस’ उद्या साजरा होणार आहे. ‘निरोगी वयोवृद्धीसाठी योग’ अशी यंदाच्या योगदिनाची संकल्पना असून जगभरात सुमारे अडीच हजार ठिकाणी विविध संस्था संघटनांतर्फे योगविषयक कार्यक्रम होणार आहेत.   योगदिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकात्याच्या ऐतिहासिक रेड रोडवर होणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी साडे सहा वाजल्यापासून

आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. त्यामुळे पुणे तसंच छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून प्रसारित होणारं 'प्रादेशिक बातमीपत्र' या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणानंतर प्रसारित करण्यात येईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या मध्य प्रदेशात जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत. राज्यात विविध ठिकाणी योगदिनानिमित्त कार्यक्रम होणार आहेत.

<><><><><>

काँग्रेस नेते पवनराजे निंबाळकर आणि त्यांच्या चालकाच्या खून प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील आणि ७ इतर आरोपींची विशेष सीबीआय न्यायालयानं आज निर्दोष मुक्तता केली. सरकारी पक्षाची पूर्ण भिस्त माफीचा साक्षीदार झालेला पारसमल जैन याच्या साक्षीवर होती, पण त्याची साक्ष विश्वासार्ह नसल्याचं सांगून न्यायालयानं ही साक्ष फेटाळून लावली. हा संपूर्ण घटनाक्रम आणि त्यातलं कारस्थान स्पष्ट करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याचा निर्वाळा विशेष सीबीआय न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी दिला आणि आरोपींची मुक्तता केली. या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचं सीबीआयनं सांगितलं. २००६ मध्ये पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांची नवी मुंबईतल्या कळंबोली इथं गोळ्या झाडून हत्या झाली होती. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास नवी मुंबई पोलिसांनी केला, नंतर हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आलं.

<><><><><>

मुंबईत बेस्ट कर्मचाऱ्यांचा संप आज दुसऱ्या दिवशीही सुरू असून बेस्टच्या ताफ्यातल्या २ हजार ७६६ गाड्यांपैकी केवळ चार गाड्या रस्त्यावर धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. बेस्ट बस उपलब्ध नसल्याने प्रवाशांना टॅक्सी, ऑटोरिक्षा आणि इतर वाहनांचा पर्याय अवलंबवावा लागत आहे. बेस्ट संपाची कल्पना नसल्यामुळे अनेक प्रवासी काल बसथांब्यावर ताटकळत उभे होते, मात्र आज संपाची कल्पना असल्यामुळे प्रवासी इतर पर्यायाकडे वळल्याचं दिसलं. तर अनेक कर्मचाऱ्यांनी घरून काम करायला पसंती दिली.

बेस्टच्या १ हजार ९३७ चालकांपैकी केवळ २६ आणि २ हजार ६४६ वाहकांपैकी केवळ ९ जण आज कामावर हजर राहिले. परिवहन मंत्र्यांनी मेस्मा लावण्याचा इशारा देऊनही बेस्ट कर्मचारी संपावर ठाम राहिले. मागण्यांबाबत कोणताही ठोस निर्णय झाल्याशिवाय संप मागे घेणार नाही असं कर्मचाऱ्यांनी म्हटलं आहे. बेस्टच्या अर्थसंकल्पाचं बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात विलीनीकरण, २०१६ ते १०२६या कालावधीसाठी सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी आदी मागण्या बेस्ट कर्मचाऱ्यांनी केल्या आहेत.

<><><><>

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने बफर साठा योजनेंतर्गत नाफेड, एनसीसीएफमार्फत खरेदी होत असलेल्या कांद्याला पुन्हा एकदा दर वाढवून दिले आहेत. ८० रुपयांची वाढ क्विंटलमागे करण्यात आली असून गेल्या ४० दिवसात तिसऱ्यांदा दर वाढवून दिले आहेत. एकूण ४९५ रुपये दर मिळाला असून आजपासून हा दर लागू झाला आहे.

<><><><>

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला तिसरा आणि अंतिम एकदिवसीय सामना चेन्नईतील एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर सुरु झाला आहे. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला .

शेवटची बातमी हाती आली तेव्हा अफगाणिस्तानच्या १९ षटकात ४ गडी बाद ९९ धावा झाल्या होत्या.

<><><><>

विदर्भातल्या शिक्षक चळवळीतले प्रभावी संघटक, माजी आमदार आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापक बी. टी. देशमुख यांचं काल निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. देशमुख यांनी आयुष्यभर शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी आणि शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्यानं संघर्ष केला. प्राध्यापक आणि शिक्षक नेते म्हणून उच्च शिक्षण क्षेत्रातल्या अनेक महत्त्वाच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रभावी नेतृत्व केलं. संशोधन, उच्च शिक्षण, विद्यापीठीय सुधारणा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्थेसाठी त्यांनी सातत्यानं कार्य केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

//<><><><><>//